# ऑक्टोबरपासून मुंबईच्या पोटात घरघर सुरू

## भुयारी मेट्रोसाठी महाकाय टनेल बोअरिंग मशीन येणार

मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - आरे कॉलनीतील कार डेपोच्या जागेमुळे वादात असलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गाचे दहा टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गासाठी भुयारी बोगदे खणण्याकरिता जुलै महिन्यात अजस्र टनेल बोअरिंग मशीन मुंबईत येणार असून ऑक्टोबरपासून मुंबईच्या पोटात यंत्रांची घरघर सुरू होणार आहे.

३३.५ कि.मी. लांबीच्या आणि एकूण २७ स्थानके असलेल्या कुलाबा ते सीप्झ मेट्रोतील भुयारी मार्गासाठी आवश्यक असलेल्या एकूण जागेपैकी ३३ टक्के जमिनीचे अधिग्रहण विविध वादात अडकले आहे. मेट्रोच्या कारशेडच्या जागेचा वाद प्रलंबित असताना मेट्रोचे मातीचे नमुने गोळा करणे तसेच स्थानकासाठी पायलिंग करणे आदी कामांपैकी १० टक्के कामे पावसाळ्यापूर्वीच पूर्ण झाली आहेत.

### गरज लागेल तशी वृक्षतोड

या मार्गावरील जोडमार्ग आणि स्थानकांसाठी सहाशेहून अधिक वृक्षांची तोड झाली आहे. आताच्या कामासाठी तातडीने आवश्यक असणारी झाडे तोडली जाणार असून उर्वरित झाडे गरज लागल्यावर तोडण्यात येणार असल्याचे मेट्रोच्या अधिकाऱ्याने सांगितले.

### १७ टीबीएम मशीन येणार

एकूण १७ 'टीबीएम' मशीन जुलै महिन्यात मुंबईत विविध देशांतून येणार आहेत. माहीमच्या नयानगर भागातून जमिनीच्या पोटात या मशीन चालण्यात येणार असून ऑक्टोबरपासून बोगदे खणण्यास प्रारंभ होईल.

### जीएसटीमुळे प्रकल्पाची किंमत घटणार

मेट्रो तीन प्रकल्पाची अंदाजे किंमत २३,१३६ कोटी रुपये असून त्यासाठी 'जायका'ही जपानची संस्था १३,२३५ कोटी इतके कर्ज देणार आहे. उर्वरित निधी केंद्र सरकार, महाराष्ट्र व इतर भागधारक देणार आहेत. जीएसटी कर लागू झाल्याने प्रकल्पाची किंमत कमी झाल्यास कंत्राटदारांना कमी रक्कम देण्यात येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



### मेट्रो - ३ प्रकल्पाची स्थिती

- प्रकल्पाचे आतापर्यंत दहा टक्के काम पूर्ण
- सिकेंट पाईल्सचे काम प्रगतिपथावर
- भुयारीकरणास ऑक्टोबर २०१७पासून प्रारंभ
- डबे, सिग्नल यंत्रणा व ट्रेनने कंट्रोलचे कंत्राट जून २०१८
- आरे ते वांद्रे कुर्ला संकुल पहिला टप्पा सप्टेंबर २०२२ पर्यंत